# अहिल्यानगर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग

वेबसाईट : www.amc.gov.in
ई-मेल : amc_anr@rediffmail.com

जा.नं. ११५ दिनांक :- २४/०४/२०२५

प्रति,
मा. प्रसिध्दी विभाग प्रमुख,
अहिल्यानगर महानगरपालिका.

विषय- दि.२६/०४/२०२५ रोजी वीज वितरण कंपनी कडून त्यांचे महत्वाच्या कामांसाठी घेण्यात येणा-या शट डाउनमुळे शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागास **एक दिवस विलंबाने पाणी पुरवठा होणार असले बाबत...**

महोदय,

विषयांकीत बाबत कळविण्यांत येते की, महावितरण कंपनीला ट्री कटिंग तसेच बाकीचे देखभाल व दुरूस्तीचे काम करण्यासाठी ३३ के.व्ही. मुळा डॅम विदयुत वाहिनी दि.२६/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत शट डाउन घेण्यात येणार आहे.

तसेच सदर शट डाउन वेळेत अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील महत्वाची दुरूस्तीची कामे शनिवार दि. २६/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते सांय. ०५.०० वाजेपर्यत घेण्यांत येणार आहे.

दरम्यान काळात मुळानगर, विळद, येथून होणारा पाण्याचा उपसा बंद राहणार असल्याने शहर पाणी वितरणासाठीच्या टाक्या भरता येणार नाही.

त्यामुळे शनिवार दि. २६/०४/२०२५ रोजी बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सुर्यनगर, निर्मलनगर, मुकूंदनगर तसेच सारस नगर, बुरूडगाव रोड, केडगाव, नगर-कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर इ. भागास [सकाळी ११.०० नंतरच्या पाणी वाटपाच्या भागास] पाणी पुरवठा होउ शकणार नाही. सदरचा पाणी पुरवठा हा रविवार दि.२७/०४/२०२५ रोजी करणेत येईल.

तसेच रविवार दि.२७/०४/२०२५ रोजी रोटेशन नुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॅालनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हाडको, स्टेशन रोड, आगरकर मळा, विनायक नगर इत्यादी भागात महानगरपालिके मार्फत पाणी पुरवठा करण्यात येणार नाही, या भागातील पाणी पुरवठा हा रविवार ऐवजी सोमवार दि.२८/०४/२०२५ रोजी करण्यात येईल.

O/C

Scanned with OKEN Scanner

सोमवार दि.२८/०४/२०२५ रोजी पाणी पुरवठा होवू घातलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार, कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने महानगरपालिका कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, व सावेडी इत्यादी भागात पाणी पुरवठा होणार नसून तो मंगळवार दि.२९/०४/२०२५ रोजी करण्यात येईल.

शहरातील पाणी पुरवठा एक दिवस बंद करून उपनगरात ज्या भागात जास्त दिवसाचे रोटेशन आलेले अशा भागात पाणी पुरवठा करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

तरी नागरीकांनी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करून महानगरपालिकेस सहकार्य करावे. अशा प्रकारची प्रेस नोट वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी.

**मा. उपायुक्त (कर) यांचे मान्यतेने.**

जल अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका

प्रत : मा.आयुक्त तथा प्रशासक, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा उपायुक्त (कर), अहिल्यानगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner